# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेतील मुख्यालय, झोनल कार्यालय, तसेच
**{ सा.प्र.वि.}** मनपाच्या ईतर ठिकाणी पूरविण्यात आलेल्या कंत्राटी संगणक चालकांच्या एजेन्सीला एक वर्षाची मुतदवाढ देण्याबाबत.

मे. विदर्भ इंफोटेक प्रा. लि., नागपूर यांना नागपुर महानगरपालिकेतील विविध विभागामध्ये संगणकीकृत कार्य करण्याकरीता संगणक चालक पूरविण्याबाबतचा एका वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. हा कालावधी दि. 10/10/2025 रोजी संपुष्टात येत असल्यामुळे विभागामार्फत ई-निविदेतील अटी व शर्ती नूसार आणि एजेन्सीचा काम समाधानकारक असल्यामुळे पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी मुतदवाढ देण्याकरीता मा आयुक्त, मनपा यांनी दि. 27/09/2025 रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

सध्या मनपामध्ये एकूण 223 संगणक चालक Minimum Wages Act फेब्रुवारी 2015 च्या महाराष्ट्र शासनाच्या "स्थानिक स्वराज्य संस्था" च्या सध्या सुरु असलेले रु. 25,050/- + (Rs. 936.127/- Contractor Profit / Service Charge) प्रती संगणक चालक प्रती माह कार्यरत आहेत. याकरीता मनपाला वार्षिक अंदाजे एकूण रु. 695.38 लक्ष खर्च अपेक्षित आहे. यामध्ये Minimum Wages Act अंतर्गत शासनाचे दर वाढल्यास किंवा त्यामध्ये बदल झाल्यास त्या अनुषंगाने जी वाढ होईल किंवा बदल होईल त्याचा फरक (Basic & Special Pay, PF etc and GST if applicable etc) मनपाव्दारे निविदाकारास देणे गरजेचे आहे.

उपरोक्त कार्य हे पद क्रं. A28900130607 अंतर्गत करण्यात येणार असल्यामुळे 2025-2026 या आर्थिक वर्षात रु. 900 लक्ष प्रावधान उपलब्ध आहे. सबब मे. विदर्भ इंफोटेक प्रा. लि., नागपूर या एजेन्सीला मनपामध्ये सुरु असलेल्या दर, अटी व शर्तीवर कंत्राटी पध्दतीने संगणक चालक पूरविण्याकरीता 1 वर्ष कालावधीकरीता म्हणजे दि. 11/10/2025 पासून 10/10/2026 पर्यंत मुदतवाढ देण्याताबाबतचा प्रस्तावास मंजुरी प्रदान करणे.

**टिप:-**

1) हा खर्च पद क्रं. A28900130607 अंतर्गत करण्यात येईल व यापदांतर्गतअर्थसंकल्प 2025-2026 मध्ये रू. 900 लक्ष चे प्रावधान उपलब्धआहे.
2) सविस्तर टिपणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 312/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 06/10/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील

प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेतील मुख्यालय, झोनल कार्यालय, तसेच मनपाच्या ईतर ठिकाणी पूरविण्यात आलेल्या कंत्राटी संगणक चालकांच्या एजेन्सीला एक वर्षाची मुतदवाढ देण्याबाबत.

मे. विदर्भ इंफोटेक प्रा. लि., नागपूर यांना नागपुर महानगरपालिकेतील विविध विभागामध्ये संगणकीकृत कार्य करण्याकरीता संगणक चालक पूरविण्याबाबतचा एका वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. हा कालावधी दि. 10/10/2025 रोजी संपुष्टात येत असल्यामुळे विभागामार्फत ई-निविदेतील अटी व शर्ती नूसार आणि एजेन्सीचा काम समाधानकारक असल्यामुळे पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी मुतदवाढ देण्याकरीता मा आयुक्त, मनपा यांनी दि. 27/09/2025 रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

सध्या मनपामध्ये एकूण 223 संगणक चालक Minimum Wages Act फेब्रुवारी 2015 च्या महाराष्ट्र शासनाच्या “स्थानिक स्वराज्य संस्था” च्या सध्या सुरु असलेले रु. 25,050/- + (Rs. 936.127/- Contractor Profit / Service Charge) प्रती संगणक चालक प्रती माह कार्यरत आहेत. याकरीता मनपाला वार्षिक अंदाजे एकूण रु. 695.38 लक्ष खर्च अपेक्षित आहे. यामध्ये Minimum Wages Act अंतर्गत शासनाचे दर वाढल्यास किंवा त्यामध्ये बदल झाल्यास त्या अनुषंगाने जी वाढ होईल किंवा बदल होईल त्याचा फरक (Basic & Special Pay, PF etc and GST if applicable etc) मनपाव्दारे निविदाकारास देणे गरजेचे आहे.

उपरोक्त कार्य हे पद क्रं. A28900130607 अंतर्गत करण्यात येणार असल्यामुळे 2025-2026 या आर्थिक वर्षात रु. 900 लक्ष प्रावधान उपलब्ध आहे. सबब मे. विदर्भ इंफोटेक प्रा. लि., नागपूर या एजेन्सीला मनपामध्ये सुरु असलेल्या दर, अटी व शर्तीवर कंत्राटी पध्दतीने संगणक चालक पूरविण्याकरीता 1 वर्ष कालावधीकरीता म्हणजे दि. 11/10/2025 पासून 10/10/2026 पर्यंत मुदतवाढ देण्याताबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.